**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र./विप्र-७/राकृवि/मासु/२०२०-२१ / र-९८७ /२०२०
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५
दिनांक :- ०७/१०/२०२०

प्रति,

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद --------( सर्व )

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
------------------------(सर्व)

३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद --------( सर्व )

४) कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद --------( सर्व )

विषय :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून सन २०२०-२१ मध्ये अनुसूचीत जाती व जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या योजनेच्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ :- १. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३५/३अे, दि.१३.०९.२०१९

२. कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना जा.क्र./विप्र-७/राकृवि/मासु/२०१९-२० /२२५४/२०१९ दि.१७.०९.२०२०

३. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३५/३अे, दि.२२.०९.२०२०

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्राप्त होणा-या निधीतून राज्यातील अनुसूचीत जाती व जमाती प्रवर्गातील शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या प्रकल्पासाठी सन २०१९-२० मध्ये अनुसूचीत जाती प्रवर्गासाठी रु.२२.५० कोटी तसेच अनुसूचीत जमाती प्रवर्गासाठी रु.२२.५० कोटी निधीच्या कार्यक्रमास उपरोक्त संदर्भिय दि.१३.०९.२०१९ चे शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या अनुषंगाने सदर प्रकल्प राबविण्यासाठी कृषि आयुक्तालयाचे उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रानुसार सर्व संबंधितांना सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२१ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतक-यांना नवीन विहिरीचा लाभ देणे हा कार्यक्रम राबविण्यासाठी रु.५८.७७ कोटी निधीच्या खर्चास उपरोक्त संदर्भ क्र.३ चे शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरही (www.maharashtra.gov.in) प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२००९२२१५०११५२४०१ आहे.

अनुसुचित जाती व जमाती प्रवर्गासाठी नवीन विहीरीचा लाभ ही योजना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राबविण्यासाठी जिल्हानिहाय देण्यात येत असलेल्या भौतिक व आर्थिक लक्षांकाच्या तपशीलानुसार योजना राबविण्यासाठी सदर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेची अंमलबजावणी तात्काळ सुरु करावी.चालू वर्षासाठी सदर निधीच्या मर्यादेत लाभार्थ्यांची निवड करुन मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेची अंमलबजावणी तात्काळ सुरु करावी. मंजूर तरतुदीचे वितरण कृषि आयुक्तालय स्तरावरुन थेट संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना करण्यात येईल. सदर निधी नियोजित प्रयोजनासाठी पुर्णतः खर्च करण्याबाबत कार्यवाहीचे नियोजन व अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे

कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.

(१) मा. सचिव, (कृषी ) कृषि व पदुम विभाग , मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

(२) मा. अवर सचिव, राष्ट्रीय कृषि विकास योजना, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

प्रत : माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

विभागीय कृषि सहसंचालक, --------------- (सर्व)

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून सन २०२०-२१ करिता अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गासाठी नवीन विहीरीचा लाभ

### मार्गदर्शक सुचना

**प्रस्तावना :** सन २०२०-२१ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतक-यांना नवीन विहिरीचा लाभ देणे हा कार्यक्रम राबविण्यासाठी रु.५८.७७ कोटी निधीच्या खर्चास शासनाने शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३५/३अे, दि.२२.०९.२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर योजना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात पुढील प्रमाणे राबविण्यात यावी.

**१.** सदर योजनेमध्ये सन २०१९-२० या वर्षात रु.१.५० लाख मर्यादेपर्यंत वार्षिक उत्पन्न असणा-या अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गातील शेतक-यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना या योजनांच्या धर्तीवर नवीन विहीर या बाबीसाठी रु.२.५० लाख च्या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

२. **लाभार्थी पात्रतेचे निकष :**

१. लाभार्थी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक राहील.
२. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.
३. नवीन विहिरीचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडे त्याच्या स्वत:चे नावे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६ हे.क्षेत्र असणे आवश्यक राहील.
४. शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे.( नगर पंचायत, नगरपालीका व महानगर पालिका क्षेत्राबाहेरील)
५. लाभार्थ्याकडे स्वत:चे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.
६. लाभार्थ्यांचे स्वत:चे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.
७. स्वर्गीय कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनांतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतकऱ्यांची तसेच परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम, २००६ नुसार वनपटटेधारक शेतक-यांची या योजनेंतर्गत प्राधान्याने लाभार्थी म्हणून निवड करावी .
८. शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- पेक्षा जास्त नसावे.
९. ज्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,०००/- चे मर्यादेत आहे अशा शेतक-यांनी संबंधीत तहसिलदार यांचेकडून सन २०१९-२० चे उत्पन्नाचा अद्यावत दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

**३. जिल्हा निवड समिती :** राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचीत जाती व जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ ही योजना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना(क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनांशी अभिसरण (convergence) पध्दतीने राबवावयाची असल्याने सदर योजनेतून नवीन विहीरीचा लाभ घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना(क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) सन २०२०-२१ या योजनांकरीता ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या शेतक-यांच्या अर्जामधूनच पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. सदर कार्यक्रमांतर्गत केवळ नवीन विहीर या घटकाचा लाभ द्यावयाचा असल्याने सदर लाभार्थ्यांना नियमित योजनेतील इतर घटकांचा लाभ संबंधित योजनेतून अनुज्ञेय राहील, जेणेकरुन अधिक लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य होईल. सदर कार्यक्रमाचा कालावधी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा (दि.३१.०३.२०२१ पर्यंत) आहे. सदर कालावधीत निधी खर्च पडण्याच्या दृष्टीने संबंधित योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांनी नवीन विहीर या घटकासाठी मागणी केली आहे त्यांना प्रथम प्राधान्याने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत निधीतून लाभ द्यावा. सदर योजनेतील निधी पुर्णत: खर्ची पडले नंतर उर्वरीत लाभार्थ्यांना नियमित योजनेतून या घटकाचा लाभ द्यावा.

पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषद कार्यालयास शिफारसीसह प्राप्त होणा-या पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून जिल्हा स्तरावर लाभार्थ्यांची निवड डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना(क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनांतर्गत गठीत केलेल्या पुढील निवड समिती मार्फतच करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | - | अध्यक्ष |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुसिंचन, जि.प. | - | सदस्य |
| भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे जिल्हास्तरीय अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग | - | सदस्य |
| कृषि विकास अधिकारी, जि. प. | - | सदस्य सचिव |

**लाभार्थी निवड करताना समितीने घ्यावयाची दक्षता** - कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कृषि गणने नुसार जिल्हयातील एकूण अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतक-यांपैकी योजनेच्या निकषात पात्र असणा-या (०.४० हे ते ६.०० हे क्षेत्र धारण करणा-या) संबंधित तालुक्यातील सदर प्रवर्गाच्या शेतक-यांच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक तालुक्यांचा आर्थिक लक्षांक निश्चित करावा व सदर लक्षांकाच्या मर्यादेत संबंधित तालुक्यातील इच्छुक शेतक-यांमधुन पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. कृषि गणना अहवाल कृषि विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संबंधित तालुक्याच्या आर्थिक लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा निवड समितीने लाभार्थ्यांची सोडत पध्दतीने निवड करावी. ही सोडत प्रक्रिया अर्जदारांच्या व लोक प्रतिनिधींच्या उपस्थितीत जिल्हास्तरावर तालुकानिहाय राबवावी. अशाप्रकारे , सोडतीव्दारे प्रत्येक तालुक्यातील लाभार्थ्यांची निवड यादी तसेच, प्रतिक्षा यादी क्रमवारीनुसार प्रसिध्द करावी. सदर तालुकानिहाय याद्यांच्या प्रती पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या सुचना फलकावर लावाव्यात तसेच, जिल्हा परिषदेच्या/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करावी. लाभार्थी निवड लॉटरी पध्दतीने करताना "इन कॅमेरा" करावी. शासनाकडून मंजूर कार्यक्रमापैकी व प्रत्यक्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेतच जिल्हानिहाय लाभार्थी निवड करावी, जेणेकरुन प्रकरणे प्रलंबीत राहण्याचा व शासनावर भविष्यात अतिरिक्त आर्थिक बोजाचा प्रश्न निर्माण होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कृषि विकास अधिकारी यांची राहील.

योजनेंतर्गत बाबींची विहित कालावधीत अंमलबजावणी न करणा-या लाभार्थ्यांची पूर्व संमती रद्द करण्यात यावी व तसे त्यांना लेखी कळवावे. तद्नंतर प्रतिक्षा यादीतील क्रमवारी नुसार पात्र असणा-या पुढील लाभार्थ्याची निवड करावी. तालुकानिहाय आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत पात्र लाभार्थी न मिळाल्यास ज्या तालुक्यातील पात्र शेतक-यांमधून समन्यायी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड करणेबाबतची कार्यवाही जिल्हा निवड समितीने करावी. पात्र लाभार्थ्यांची यादी कृषि विकास अधिकारी यांनी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना पाठवावी. सदर कार्यक्रमांतर्गत मंजूर केलेल्या तरतुदीच्या मर्यादेत जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विकास अधिकारी यांचे समन्वयाने अंमलबजावणी करावी.

## ४. अर्ज व त्यावरील कार्यपध्दती :

अ) कृषि गणनेनुसार तालुकानिहाय लक्षांक निश्चित करावा.

ब) अर्जाची प्रत अर्जदाराने आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसांक्षाकित छायांकित प्रतीसह कृषि अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांचेकडे स्वहस्ते सादर करावा व कृ.अ. पं.स. यांनी अर्जाची लेखी पोहोच दयावी, अपुर्ण अर्जाबाबत अर्जदारास उणीवांच्या पुर्ततेस विहित मर्यादा/ कालावधी देवून परीपुर्ण अर्ज / प्रस्ताव सादर करणेबाबात लेखी कळविण्यात यावे.

क) पंचायत समिती स्तरावर प्राप्त झालेले अर्ज कृषि अधिकारी (विघयो) यांनी क्षेत्रीय पहाणी करुन गट विकास अधिकारी यांचेमार्फत जिल्हास्तरीय निवड समितीकडे अंतिम निवडीसाठी सादर करावेत.

ड) तालुका स्तरावर पात्र अर्जदार / लाभधारक यांचेबाबत भविष्यात काही समस्या उद्‌भवल्यास त्यास कृषि अधिकारी व गट विकास अधिकारी हे जबाबदार राहतील.

इ) जिल्हा स्तरावर प्राप्त अर्जांची / प्रस्तावांची योजनेच्या निकषाआधारे जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी नियमित छाननी करावी. छाननीत त्रुटी आढळलेल्या अर्जाबाबत संबंधीत कृषि अधिकारी, पंचायत समिती यांचेमार्फत १० दिवसांचे आत पुर्तता करुन घ्यावी. १० दिवसात पुर्तता न झाल्यास संबंधीत लाभार्थ्यास अर्ज बाद केल्याचे लेखी कळवावे. अंतिम छाननी अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर ५ दिवसाच्या आत पूर्ण करावी.

ई) तालुक्याच्या लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त लाभार्थी निवडीचे निकषानुसार परिपुर्ण अर्जातून लॉटरी पध्दतीने पुढील ५ दिवसात लाभार्थी निवड करावी.

उ) निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थी योजनेचा लाभ न घेण्याची शक्यता विचारांत घेता संबंधीत तालुक्याच्या आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत लाभार्थी लॉटरी पध्दतीने निवडल्यानंतर उर्वरित लाभार्थ्यांची लॉटरीच्या क्रमवारीनुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. प्रतिक्षाधीन यादीवरील अर्जदारास पाठविण्यात आलेल्या पत्रामध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांपैकी काही लाभार्थ्यांची निवड अपरीहार्य कारणास्तव रद्द झाल्यासच त्यांची प्राथम्य क्रमानुसार निवड करण्यात येईल असे स्पष्टपणे कृषि विकास अधिकारी यांनी लेखी कळवावे.

ऊ) अंतिम निवड झालेल्या लाभार्थ्यास कृषि विकास अधिकारी यांनी पंचायत समिती मार्फत निवड झाल्याचे लेखी कळवावे.

ए) वैयक्तीक लाभार्थी निवडताना महिला व अपंग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. एकूण मंजूर निधीपैकी ३ टक्के निधी अपंग लाभार्थ्याकरीता राखून ठेवावा. परंतु असे लाभार्थी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास तसे आवश्यक अभिलेख संग्रही ठेवून इतर शेतकऱ्यांना लाभ देण्यात यावा.

ओ) जिल्हयाच्या लक्षांकाप्रमाणे अंतिम निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या मागणीनुसार परिशिष्ठ क्र. १ प्रमाणे जिल्हयाचा घटकनिहाय तसेच लाभार्थीनिहाय प्रारुप आराखडा तयार करुन तो लाभार्थी निवड झाल्याच्या दिनांकानंतर ५ दिवसांचे आत कृषि आयुक्तालयास सादर करावा. प्रारुप आराखडा कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी कृषि विकास अधिकारी यांची राहील.

## ५. घटक अंमलबजावणी :

**नवीन विहीर** – नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतून नवीन सिंचन विहीरीचा लाभ घेतलेला नसावा. लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासुन ५०० फुटाचे अंतरामध्ये दुसरी विहीर नसावी. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरीष्ठ भू वैज्ञानिक यांचेकडील पाणी उपलब्धततेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. पाणी उपलब्धतेचे वैयक्तीक दाखले उपलब्ध होत नसल्यास भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत गावासाठी / गावाच्या समुहासाठी पाणी उपलब्धतेचे दाखले प्राप्त करुन घ्यावेत. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (GSDA) च्या व्याख्येनुसार सेमीक्रिटीकल / क्रिटीकल / ओव्हर एक्सप्लॉयटेड क्षेत्रामध्ये नवीन विहीर घेण्यात येवू नये. स्थानिक व भौगोलिक परिस्थीतीनुसार शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१ मंत्रालय मुंबई-३२ दि.१७ डिसेंबर, २०१२ नुसार विभागीय आयुक्त स्तरावरील समितीने निर्धारित केलेल्या तांत्रिक निकषानुसार कामे करुन विहीत वित्तीय मर्यादेच्या आत अनुदान अनुज्ञेय राहील.

नवीन विहीरीच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करुन त्यास कृषि विकास अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. अंदाजपत्रकाप्रमाणे काम भौतिक दृष्टया (व्यास व खोली) पुर्ण झाल्यास जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी पुर्णत्वाचा दाखला निर्गमित करावा. अंदाज पत्रकाप्रमाणे विहीत केलेल्या खोलीपेक्षा अगोदरच ०.४० हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध झाल्यास व विहीर सुरक्षीत स्थीतीत आहे याची खात्री पटल्यास लाभधारकाची लेखी संमती घेवून काम पुर्णत्वाचे दाखले निर्गमित करता येतील. अंदाजपत्रकाप्रमाणे मंजूर रक्कम खर्च झाल्यास मात्र बांधकाम प्रलंबीत राहील्यास पुर्णत्वाचा दाखला निर्गमित करु नये. कामाच्या शेवटच्या हप्त्याचे अनुदान पुर्णत्वाचा दाखला, विहीरीचे लाभार्थ्यांसह, जीपीएस लोकेशनसह फोटो व मुल्यांकन सादर केल्याशिवाय देय रहाणार नाही. कृषि अधिकारी (पं.स.) यांचेमार्फत विहीरीचे कामाची मापन पुस्तिका नोंदविण्यात यावी. तथापि, नवीन विहीर व जुनी विहीर दुरुस्तीच्या कामाचा वर्कलोड जास्त असल्यास गरजेनुसार कृषि पदवी धारण करणा-या विस्तार अधिकारी (कृषि) यांना मोजमाप नोंदविण्याचे अधिकार देण्यास कृषि आयुक्तालयाची हरकत नसल्याबाबत कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. विप्र-७/आउयो/विघयो/संकिर्ण/००९/२०१८, दि. ५ जानेवारी, १८ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार ज्या तालुक्यांमध्ये कामाचा वर्कलोड जास्त आहे त्या तालुक्यांमध्ये कृषि पदवी धारण करणा-या विस्तार अधिकारी (कृषि) यांनी मोजमाप नोंदविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे आदेश घेवून मोजमाप नोंदविण्याचे काम सोपविण्यात यावे. त्याचप्रमाणे विस्तार अधिकाऱ्यास सोपविलेल्या कामांची नोंद सुरुवातीपासुन शेवटपर्यंत शक्यतो एकच अधिकारी घेईल याची कृषि विकास अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. नवीन विहीरीची आखणी करताना, निम्मे काम झालेलेचे व विहीर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देताना अक्षांश, रेखांश व स्थानिक चिन्हासह छायाचित्र घेवून ते नस्तीस ठेवावे.

सोडतीव्दारे नवीन विहिर या बाबीसाठी निवडलेल्या लाभार्थ्यांना त्यांची निवड झाल्या बाबत सोडतीनंतर ७ दिवसात लेखी सूचनेव्दारे कळवावे. तद्नंतर लाभार्थ्याच्या प्रक्षेत्राची स्थळ पहाणी करावी व तांत्रिक व्यवहार्यता तपासणी अंती, लाभार्थ्याचे नवीन विहीर खोदावयाचे ठिकाण तांत्रिक दृष्टया योग्य असल्याचे आढळल्यास सदर बाबीचे अंदाजपत्रक मंजूर करुन संबंधित लाभार्थ्याच्या प्रस्तावांना पूर्वसंमत्ती देण्याची कार्यवाही सोडतीच्या दिनांकापासून ४५ दिवसाच्या आत करावी.

त्याचप्रमाणे, स्थळपहाणी मध्ये ज्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव तांत्रिकदृष्टया अयोग्य आढळतील अशा लाभार्थ्यांची निवड रद्द करावी व प्रतिक्षा यादीतील पात्र असणा-या पुढील लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

नवीन विहीरीसाठी लाभार्थीची निवड केल्यानंतर लाभार्थ्यास कृषि अधिकारी (विघयो) पंचायत समिती यांनी कार्यारंभ आदेश दयावेत. तसेच विहीरीची आखणी (लेआऊट) करुन दयावी. निवड होवून कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३० दिवसांच्या आत विहीरीचे काम सुरु करणे लाभार्थ्यावर बंधनकारक राहील. कार्यारंभ आदेश देवूनही विहीरीचे काम ३० दिवसांत सबळ कारणाशिवाय सुरु न केलेल्या लाभार्थ्यांना लेखी कळवुन काम रद्द करावे. निवड रद्द केलेबाबत वर्तमानपत्रातुन प्रसिध्दी देण्यात यावी व प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना संधी देण्यात यावी. तसेच विहीत केलेल्या मुदतीत काम पुर्ण करणे लाभार्थ्यावर बंधनकारक राहील. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर निधी पीएफएमएस प्रणालीव्दारे जिल्हास्तरावरील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या पीएफएमएस प्रणालीतील राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या खात्यात जमा होईल. कृषि अधिकारी पंचायत समिती यांनी दर १५ दिवसांनी विहीरीच्या कामाचा आढावा घेवून कामे विहीत कालावधीत पुर्ण करुन घ्यावीत. सदर प्रकल्पांतर्गत निवडलेल्या लाभार्थींच्या नवीन विहीरीच्या कामाची देयके अदा करण्यासाठी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सदर देयकास तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयामार्फत पीएफएमएस प्रणालीव्दारे मेकर म्हणून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे शिफारसीसाठी सादर करावीत. तसेच देयकाची एक प्रत कृषि विकास अधिकारी यांचेकडे सादर करावी. कृषि विकास अधिकारी यांनी प्राप्त झालेला प्रस्ताव अंतिम प्रदानासाठी सदर देयके तपासून त्यांची लाभार्थीनिहाय पीएफएमएस डीबीटीच्या विहीत प्रपत्रात यादी तयार करुन शिफारसीसह संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावीत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पीएफएमएस प्रणालीव्दारे चेकर या नात्याने अनुदान संबंधित लाभार्थ्यास अदा करावे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पीएफएमएस प्रणालीतून डीबीटीव्दारे अनुदान अदा करण्याकरिता आवश्यक असलेल्या माहितीचे विहीत प्रपत्र संबंधित कृषि विकास अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे. नविन विहरीचे अनुदान घेतलेल्या लाभार्थीचे ७/१२ वर विहीरीची नोंद घेणेबाबतची जबाबदारी संबंधीत कृषि अधिकारी (पं. स.) यांची राहील. लाभार्थ्याने विहीरीच्या कामाच्या दरम्यान मजूरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. याची संपुर्ण जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

६. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी लाभार्थ्यांना कमाल १ वर्षाचा कालावधी अनुज्ञेय राहील.

७. **प्रशासकीय व वित्तीय मान्यता :** राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सदर कार्यक्रमासाठीचा कृषि आयुक्तालय स्तरावर प्राप्त निधी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना वितरीत करुन देण्यात येत असल्याने सदर योजनेशी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घ्यावी.

**८. लाभार्थ्यांची निवड रद्द करणे** : लाभार्थीच्या निवडीचे अंतीम अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील. खालील कारणांमुळे जर काही लाभार्थीची निवड रद्द करणे क्रमप्राप्त असल्यास त्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील.

८.१ समितीने निवड केलेला शेतकरी मयत झाल्यास.

८.२ निवड केलेल्या शेतक-याने सर्व शेतजमीन विकून तो भुमीहीन झाला असल्यास.

८.३ निवड केलेला शेतकरी शेती विकास योजना हाती घेण्यास इच्छूक नसल्यास तसेच विहीत कालमर्यादेत काम पुर्ण करण्यास टाळाटाळ करीत असल्यास.

८.४ निवड केलेल्या शेतक-याने अर्थसहाय्य घेण्यास नकार दिल्यास.

८.५ निवड केलेला शेतकरी योजनेखाली घेतलेल्या अनुदानाचा गैरवापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास.

८.६ लाभार्थीची निवड शासनाने विहीत केलेल्या निकषांनुसार झाली नसल्याचे आढळून आल्यास.

वरील परिस्थितीमुळे लाभार्थ्याची निवड रद्द झाल्यास त्याबाबत कागदोपत्री सर्व आवश्यक पुरावे ठेवून तसे लाभधारकास लेखी कळविणे संबंधीत कृषि विकास अधिकारी यांना बंधनकारक राहील.

८.७ मयत झालेल्या लाभधारकाबाबत त्यांचे कायदेशीर वारसांची निवड जिल्हा स्तरीय समितीने करावी व उर्वरीत अर्थसहाय्य त्यांना देण्याबाबत निर्णय घेवून कार्यवाही करावी. अशा प्रकरणी कायदेशीर बाबींची सर्वतोपरी पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा स्तरीय समितीची राहील.

**८.८ लाभार्थी रजिस्टर** - सदर योजनेंतर्गत लाभार्थींची नोंदवही जिल्हास्तर व पंचायत समिती स्तरावर अद्यावत ठेवण्यात यावी. पंचायत समिती स्तरावरील नोंदवहीची किमान महिन्यातुन एकदा तपासणी करण्याची जबाबदारी जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांची राहील. तसेच जिल्हास्तरावरील नोंदवहिची तपासणी करण्याची जबाबदारी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/ कृषि विकास अधिकारी यांची राहील.

९. **प्रचार व प्रसिध्दी :** या योजनेची माहिती सर्व शेतकरी बांधवांना व्हावी या दृष्टिने विभागीय स्तरावर विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. आपल्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत देखील प्रसिध्दी द्यावी. सदर योजनेची सविस्तर माहिती पंचायत समिती स्तरावर गट विकास अधिकारी, कृषि अधिकारी (वि.घ.यो.) तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) यांच्याकडे उपलब्ध ठेवावी. योजनेसाठी अंतीमतः निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीस पाठविण्यात यावी. तसेच तसेच जिल्हा परिषदेच्या व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

योजनेची माहिती सर्व सामान्य लोकांना व स्वयंसेवी संस्थांना होण्याकरीता स्थानिक वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यांत यावी. कृषि विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी/ अधिकारी यांनी गावपातळी / तालुका स्तरावर प्रदर्शनाच्या माध्यमातूनही योजनेची माहिती देण्यात यावी.

सन २०२०-२१ मध्ये सदर योजना राबविताना कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा. नवीन विहीरीचे कामाचे कार्यारंभ आदेश संपुर्ण जिल्हयामध्ये लाभार्थींना एकाच दिवशी वाटप केल्यास सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी प्रभावीपणे सर्व संबंधीतापर्यंत पोहोचेल.

**११. तांत्रिक मान्यता :-** योजनेच्या मार्गदर्शक सूचना याच योजनेसाठी तांत्रिक मान्यता समजण्यात याव्यात.

**१२. प्रशासकीय खर्च :-** वितरीत निधीच्या ०.१० टक्के निधी कृषि आयुक्तालय स्तरावरील प्रशासकीय खर्चासाठी राखून ठेवण्यात येत आहे. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे पीएफएमएस खात्यावर वितरीत निधीच्या ०.२० टक्के निधी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर व ०.२० टक्के निधी कृषि विकास अधिकारी स्तरावरील प्रशासकीय खर्चासाठी वापरता येईल.सदर कार्यवाही सुधारीत राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सुचना मधील मुद्दा क्र.०९ व Annexure-E प्रमाणे करण्यात यावी.

**१३. मासिक प्रगती अहवालः** योजनेचा मासिक प्रगती अहवाल कृषि विकास अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्र १ ते ३ मध्ये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कृषि आयुक्तालय, संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक तसेच समाज कल्याण व आदिवासी विकास विभागाकडे नियमीतपणे पाठवावा. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने विभागाचा एकत्रित मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास ईमेलव्दारे (ddappscptsp@rediffmail.com) तसेच टपालाव्दारे सादर करावा.

**१४. तपासणीः** योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी करावयाच्या घटकनिहाय तपासणीची टक्केवारी परिशिष्ठ २ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

सदर परिशिष्ठात दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी त्याचे कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची क्षेत्रनिहाय समप्रमाणात परिशिष्ठ ३ नुसार तपासणी करुन तपासणीचा अहवाल प्रपत्र-१ व प्रपत्र-२ मध्ये कृषि आयुक्तालयास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत ईमेलव्दारे (ddappscptsp@rediffmail.com) सादर करावा.

सोबत : १) परिशिष्ठ १ ते ३

२) प्रपत्र – १ व २

संचालक
(विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## परिशिष्ट - १

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या योजनेचा प्रारुप आराखडा**

जिल्हा ------------- दिनांक --------------

निवडलेले एकूण लाभार्थी संख्या : महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----

सन २०२०-२१ मध्ये प्राप्त निधी -------------

अ)

| अ. क्र. | लाभार्थींचे नाव | अनुसूचीत जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची नवीन विहीर मागणी(रु.लाखात) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |

ब)

| अ. क्र. | लाभार्थींचे नाव | अनुसूचीत जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची नवीन विहीर मागणी(रु.लाखात) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |

## परिशिष्ट – २

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या योजने अंतर्गत अधिकाऱ्यांनी करावयाच्या तपासणीची टक्केवारी**

| अ. क्र. | तपासणी अधिकारी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सह संचालक (कार्यालयातील वर्ग -२ व त्या पुढील अधिकारी) | १ |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (कार्यालयातील वर्ग -२ व त्या पुढील अधिकारी) | १ |
| ३ | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद | ३ |
| ४ | जिल्हा कृषि अधिकारी (वि.घ.यो.) जिल्हा परिषद | १५ |
| ५ | कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समितीस्तर | १०० |

## परिशिष्ठ – ३

**राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या योजने अंतर्गत नवीन विहीर या घटकाच्या तपासणीसाठी परिशिष्ठ –**

१. तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

२. तपासणी दिनांक

३. तपासणी केलेल्या लाभार्थीचे नाव व पत्ता

४. नवीन विहीर घेतलेल्या करावयाच्या क्षेत्राचा सर्वे नंबर व क्षेत्र

५. नवीन विहीर अंदाजपत्रकीय खर्च

६. तांत्रिक मान्यता दिनांक व रक्कम

७. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या कामाची स्थिती

८. तपासणीच्या दिनांकास विहीरीच्या पुर्ण केलेल्या कामाची अंदाजीत रक्कम

९. पैकी लाभार्थीस दिलेले अनुदान

१०. रक्कम कोणत्याप्रकारे अदा केली

११. लाभार्थ्यांचा बँक खाते तपशील (बँकेचे नाव व खाते क्रमांक)

१२. लाभार्थ्याच्या बँक खात्यावर अनुदान अदा केल्याचा दिनांक

१३. तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय

तपासणी दिनांक

तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी

प्रपत्र — १

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून अनुसूचीत जाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या योजने अंतर्गत सन २०२०-२१ मधील खर्चाचा अहवाल

**जिल्हा -----** **अहवाल कालावधी माहे , अखेर**

निवडलेले एकूण लाभार्थी संख्या -महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----

निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी पुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या ----- २०२०-२१ मध्ये प्राप्त निधी - -----

अपुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या ----- एकुण उपलब्ध निधी -----

| अ. क्र. | घटक | लक्षांक | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **नवीन विहीर** | | | | |
| सन २०२०-२१ या वर्षात प्रत्यक्ष निवडलेले लाभार्थी - | | | | | |
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर मागणीप्रमाणे संपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी - | | | | | |
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर कोणताही लाभ न दिलेले शिल्लक लाभार्थी - | | | | | |

प्रपत्र — २

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून अनुसूचीत जमाती प्रवर्गाच्या शेतक-यांना नवीन विहीरीचा लाभ या योजने अंतर्गत सन २०२०-२१ मधील खर्चाचा अहवाल

**जिल्हा -----** **अहवाल कालावधी माहे , २०२० अखेर**

निवडलेले एकूण लाभार्थी संख्या -महिला----, अपंग-----, इतर ------ एकुण -----

निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी पुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थींची संख्या ----- २०२०-२१ मध्ये प्राप्त निधी - -----

अपुर्ण लाभ दिलेल्या लाभार्थीची संख्या ----- एकुण उपलब्ध निधी -----

| अ. क्र. | घटक | लक्षांक | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **नवीन विहीर** | | | | |
| सन २०२०-२१ या वर्षात प्रत्यक्ष निवडलेले लाभार्थी - | | | | | |
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर मागणीप्रमाणे संपुर्ण लाभ दिलेले लाभार्थी - | | | | | |
| निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी माहे ----- अखेर कोणताही लाभ न दिलेले शिल्लक लाभार्थी - | | | | | |

राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या निधीतून अनुसूचित जाती/अनुसुचित जमातीच्या शेतक-यांना नवीन सिंचन विहीरीसाठी अनुदान सन २०२०-२१ या योजने करीता अतिरिक्त अनुदान देणेसाठी जिल्हा निहाय नवीन विहीर लाभार्थी लक्षांक

| अ. क्र. | जिल्हा | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | एकूण नवीन विहिरीसाठी लाभार्थी लक्षांक | एकूण आर्थिक लक्षांक (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन विहिरीसाठी लाभार्थी लक्षांक | आर्थिक लक्षांक (रुपये लाखात) | नवीन विहिरीसाठी लाभार्थी लक्षांक | आर्थिक लक्षांक (रुपये लाखात) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ठाणे | ० | ०.०० | १४ | ३५.१४ | १४ | ३५.१४ |
| २ | रायगड | ० | ०.०० | १८ | ४५.१८ | १८ | ४५.१८ |
| ३ | रत्नागीरी | १८ | ४५.१८ | ० | ०.०० | १८ | ४५.१८ |
| ४ | नाशिक | १८ | ४५.१८ | ७२ | १८०.७२ | ९० | २२५.९० |
| ५ | धुळे | ० | ०.०० | ३६ | ९०.३६ | ३६ | ९०.३६ |
| ६ | नंदुरबार | १८ | ४५.१८ | १७८ | ४४६.७८ | १९६ | ४९१.९६ |
| ७ | जळगाव | ७२ | १८०.७२ | २२ | ५५.२२ | ९४ | २३५.९४ |
| ८ | अहमदनगर | ० | ०.०० | ३२ | ८०.३२ | ३२ | ८०.३२ |
| ९ | पुणे | ३ | ७.५३ | ३ | ७.५३ | ६ | १५.०६ |
| १० | सोलापुर | ८ | २०.०८ | ० | ०.०० | ८ | २०.०८ |
| ११ | औरंगाबाद | ४४ | ११०.४४ | ४५ | ११२.९५ | ८९ | २२३.३९ |
| १२ | जालना | ८६ | २१५.८६ | ३६ | ९०.३६ | १२२ | ३०६.२२ |
| १३ | बीड | १०५ | २६३.५५ | २७ | ६७.७७ | १३२ | ३३१.३२ |
| १४ | लातुर | १६ | ४०.१६ | ० | ०.०० | १६ | ४०.१६ |
| १५ | उस्मानाबाद | ८६ | २१५.८६ | ० | ०.०० | ८६ | २१५.८६ |
| १६ | नांदेड | ७० | १७५.७० | ११३ | २८३.६३ | १८३ | ४५९.३३ |
| १७ | परभणी | ७० | १७५.७० | १८ | ४५.१८ | ८८ | २२०.८८ |
| १८ | हिंगोली | १६८ | ४२१.६८ | ९० | २२५.९० | २५८ | ६४७.५८ |
| १९ | अकोला | ४२ | १०५.४२ | २१ | ५२.७१ | ६३ | १५८.१३ |
| २० | वाशिम | १८ | ४५.१८ | ० | ०.०० | १८ | ४५.१८ |
| २१ | यवतमाळ | ७६ | १९०.७६ | १३५ | ३३८.८५ | २११ | ५२९.६१ |
| २२ | वर्धा | ४४ | ११०.४४ | ० | ०.०० | ४४ | ११०.४४ |
| २३ | नागपुर | ३६ | ९०.३६ | २७ | ६७.७७ | ६३ | १५८.१३ |
| २४ | भंडारा | १२ | ३०.१२ | ६ | १५.०६ | १८ | ४५.१८ |
| २५ | गोंदिया | ० | ०.०० | ५८ | १४५.५८ | ५८ | १४५.५८ |
| २६ | चंद्रपूर | १३० | ३२६.३० | १३५ | ३३८.८५ | २६५ | ६६५.१५ |
| २७ | गडचिरोली | ३० | ७५.३० | ८४ | २१०.८४ | ११४ | २८६.१४ |
| **एकूण** | | **११७०** | **२९३६.७०** | **११७०** | **२९३६.७०** | **२३४०** | **५८७३.४०** |
| कृषि आयुक्तालय (प्र.खर्च ) | | | **१.८०** | | **१.८०** | | **३.६०** |
| **राज्य एकूण एकंदर** | | **११७०** | **२९३८.५०** | **११७०** | **२९३८.५०** | **२३४०** | **५८७७.००** |